


REGISTERED No. B. 3434

# अर्थ

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संस्थापक—प्रो. वा. गो. काळे ★ संपादक—श्री. वा. काळे

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख ६ फेब्रुवारी १९४६ अंक ६

## आगे कूच !

### आणखी एक टप्पा

**नवें काम**
१९४४ मधील
१,६७,००,००० रुपयांवर
१९४५ मधील
१,८६,००,००० रुपयांवर
—एका वर्षांत १९ लक्षांवर वाढ—
जनतेच्या वाढत्या विश्वासाचा
निश्चित पुरावा

विमा उतरण्यास किंवा एजन्सी कामास
उत्तम
**वेस्टर्न इंडिया**
आयुर्विमा कंपनी लि. सातारा.
—पुणें शाखा—
१७९ बुधवार, लक्ष्मीरस्ता पुणें २.

सर्व प्रांतांतील
सुती, गरम व रेशमी
खादीचा
सुंदर संच

**खादी मन्दिर**

२६२, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २




**रक्तवर्धक**



आयुर्वेद रसशाळा
पुणें लि. पुणें ४.

# विविध माहिती

### हिंदुस्थानचा निर्यात व्यापार

सरकार हिंदी व्यापाऱ्यांना मध्यपूर्व देशांतील व्यापार काबीज करूं देत नाहीं, ह्या तक्रारीवर सरकारनें खुलासा केला आहे कीं, खुद्द हिंदुस्थानांत अन्न, कापड व कच्चा माल ह्यांचें दुर्भिक्ष्य असल्याकारणानें या मालाच्या निर्यातीस मना करण्यांत आली आहे. ९ फेब्रुवारीला कच्चीं व कमावलेलीं कातडीं निर्यात करण्यासंबंधाचा विचार करण्यांत येईल.

### कापसाच्या उत्पादनांत सुधारणा

सेंट्रल कॉटन कमिटी कापसाच्या उत्पादनांत दिवसेंदिवस सुधारणा घडवून आणीत आहे. १९२२ ते २७ सालांत हें उत्पन्न एकरीं ९६ पौंड होतें, तें १९३७ ते ४२ मध्यें एकरीं १०९ पौंड झालें. पुढील तीन वर्षांत तेंच उत्पन्न एकरीं ११२ पौंड झालें व १९४४–४५ सालांत तें एकरीं १२२ पौंड होईल असा अंदाज आहे.

### हिंदुस्थान सरकारचें गिर्यारोहण

१९४६ च्या उन्हाळ्यांत हिंदुस्थान सरकार सिमल्यास जाणार नाहीं, असें जाहीर झालें आहे.

### भारी किंमतीच्या नोटा वटविण्यासंबंधीं संस्थानांना हुकूम

संस्थानांतील तिजोऱ्यांनीं व बँकांनीं कोणत्या रीतीनें भारी किंमतीच्या नोटा वटवून घ्याव्यात याबद्दल हिंदुस्थान सरकारनें हुकूम काढले आहेत, एवढेंच नव्हे तर ज्या संस्थानांनीं ह्यासंबंधीं हुकूम जारी केले नसतील त्या संस्थानांत कोणत्या तऱ्हेनें या नोटांची विल्हेवाट लावावी किंवा खुद्द संस्थानिकांनीं आपल्याजवळच्या भारी किंमतीच्या नोटा कशा वटवाव्यात याबद्दलहि हुकूम दिला आहे .हिंदुस्थानच्या बाहेर जर या भारी किंमतीच्या नोटा असतील तर त्या कशा वटवावयाच्या याचाहि नियमांत अंतर्भाव केला आहे.

छत्रे यांचा -कोल्हापुरी- संगीत चिवडा
वापरून पाहुण्यांस खूष ठेवा.
किंमत १ रत्तलाला २ रुपये.
मालकः–एन. व्ही. वेलणकर, गिरगांव रोड
फो. नं. ३३८४९ ] मुंबई ४.

डोंगरे यांच्या बालामृतानें
अशक्त मुलें सशक्त होतात.

### इंग्लंडमधील पांच पौंडांच्या नोटा

बँक ऑफ इंग्लंडच्या पांच पौंडी नोटा ज्या २ सप्टेंबर १९४४ पूर्वी काढल्या असतील त्या २८ फेब्रुवारी १९४६ च्या आंत परत कराव्यात असा हुकूम जारी झाला आहे. २८ फेब्रुवारी १९४६ पर्यंतच या नोटा चालतील. पुढें रद्द होतील.

### सुताचें उत्पादन

१९४४–४५ सालांत हिंदुस्थानांतील गिरण्यांनीं १६२२० लक्ष पौंड सुताची निपज केली त्यापैकीं ११५२० लक्ष पौंड गिरण्यांतच कापड तयार करण्यासाठीं खर्ची पडलें व ४७०० लक्ष पौंड सूत हातमाग व इतर विणकामाच्या वांटणीस आलें. १९४४ सालीं ६३ लक्ष पौंड सूत परदेशांत पाठविण्यांत आलें. १९४६ च्या पहिल्या सहामाहींत ७० लक्ष पौंड सूत परदेशांत पाठविण्यांत येईल. या कालांत परदेशी सुताची जवळ जवळ बिलकूल आयात झाली नाहीं. १९४४ व १९४५ सालीं गिरण्यांत ४७००० लक्ष वार कापड पैदा झालें आणि हातमाग वगैरेवर १५००० लक्ष वार कापड पैदा झालें म्हणजे दरवर्षी माणशीं जवळ जवळ १३। वार कापड उपलब्ध झालें.

### हिंदी विद्यार्थी रशियांत जाणार

एप्रिल महिन्यांत रशियांत जाण्यासाठीं २५ हिंदी विद्यार्थ्यांना परवानगी मिळाली आहे. ते रशियाचें निरीक्षण अडीच महिने फिरून करणार आहेत.

### सोळा वर्षांनंतर पोंचलेलें पोस्टकार्ड

नाशिकापासून ३० मैल असलेल्या लासलगांव या खेड्यांत ता. ८ नोव्हेंबर १९२९ सालीं पोस्टांत टाकलेलें पोस्टकार्ड ता. १७ जानेवारी १९४६ रोजीं म्हणजे सोळा वर्षें, तीन महिने, आठ दिवसांनंतर जबलपुरास बटवडा करण्यांत आलें. येवढेंच नव्हे तर कार्ड पोस्टांत टाकते वेळीं डांक हशील दोन पैसे होतें तें आतां तीन पैसे झाल्याकारणानें बटवडा घेतांना कल्लू शेरा या इसमाला दोन पैसे भुर्दंड भरावा लागला!

### जपानमधील वाढत्या किंमतीवर आळा

दोस्तांचे सर्वाधिकारी जनरल मॅक आर्थर यांनीं जपानी सरकारला वाढत्या किंमतीवर आळा घालण्याचा हुकूम दिला आहे. वाढत्या किंमतीवर आळा बसण्यासाठीं त्यांनीं पुढील तीन गोष्टी करण्याबद्दल ताकीद दिली आहेः– ( १ ) अवश्य एवढाच खर्च करणें ( २ ) जपानी लोकांच्या शिलकींतून शक्य तेवढी लूट भरून काढणें आणि ( ३ ) लूट भरून काढण्यासाठीं जपान बँक किंवा दुसऱ्या एखाद्या बँकेपासून कर्ज न काढणें.

### हाँग–काँगमधील रहिवाश्यांना बायकामुलें आणण्याची परवानगी

१ मार्च, १९४६ पासून हाँगकाँगमधील लष्करी अंमल संपुष्टांत येणार असून त्या तारखेपासून हल्लींच्या रहिवाश्यांना व यापुढें ज्यांना परवानगी मिळेल त्या भावी रहिवाश्यांना हाँगकाँगला आपलीं बायकामुलें आणण्याची परवानगी मिळणार आहे.




पंढरीनाथ ब्रिलिअन्टाईन वापरा




पुणें चीफ एजंटसः–
मेसर्स श्री दत्त एजन्सी,
१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें



# श्रीमान् इंग्लंडला मोठीं कर्जें देण्याची उपाशी हिंदुस्थानावर सक्ती

## हिंदी अर्थशास्त्रज्ञांचें पत्रक

हिंदुस्थान सरकारच्या अनियंत्रित चलनविस्ताराचें घोर परिणाम आणि त्यांचेवर आवश्यक असलेले उपाय सरकारपुढें मांडण्याचें महत्त्वाचें काम १२ एप्रिल, १९४३ रोजीं एक जाहीर पत्रक काढून हिंदुस्थानांतील प्रमुख अर्थशास्त्रज्ञांनीं केलें. मुंबई प्रांतांतील के. प्रा. वा. गो. काळे, प्रा. धनंजयराव गाडगीळ, प्रा. कर्वे, प्रा. वकील, प्रा. शहा, ह्यांनीं पुढाकार घेऊन तें पत्रक प्रसिद्ध केलें होतें व त्यास इतर प्रांतांतील कित्येक प्रमुख अर्थशास्त्रवेत्त्यांची संमति मिळविली होती. तें पत्रक हिंदुस्थान सरकारच्या फडनवीसांस सादर करण्यांत येऊन लोकांच्या माहितीसाठी त्यास प्रसिद्धीहि देण्यांत आली होती. इंग्लंड, अमेरिका, वगैरे राष्ट्रांसाठी चलन पुरवावयाचें तें हिंदुस्थान सरकारनें आपल्या लोकांच्या जवळचा फाजील पैसा आकर्षून घेण्याच्या शक्तीच्या मर्यादेंत पुरवावें आणि ह्या बाबतींत आंथरूण पाहून पाय पसरावे, असें त्या पत्रकाचें निक्षून सांगणें होतें. हिंदी अर्थशास्त्रज्ञांच्या मतास सरकारनें किती मान दिला, ह्याचें गमक म्हणजे पत्रकाची साधी पोचहि देण्याची आवश्यकता हिंदुस्थान सरकारच्या फडणवीसांस भासली नाहीं, हें होय! प्रत्यक्ष युद्ध संपून बराच काळ लोटला असला, तरी चलन विस्तार चालूच राहिला आहे आणि तो तसाच चालू रहाण्याची शक्यता ब्रिटिश फडणवीसांनीं आपल्या भाषणांत सूचित केली आहे. ब्रिटिश सरकारच्या हिंदुस्थानांतील खरेदीचे रोख पैसे हिंदुस्थानास मिळत नाहींत. ते खात्यावर मांडून, त्याच्या स्टर्लिंग रोख्यांच्या तारणावर चलनी नोटा काढण्याचा सपाटा हिंदुस्थान सरकारनें चालू ठेवला आहे. राजकीय परिस्थिति आतां थोडी पालटण्याच्या रंगांत आहे, तेव्हां पुनः एकवार मुंबई प्रांतांतील प्रमुख अर्थशास्त्रज्ञांनीं पुढाकार घेऊन हिंदुस्थान सरकारच्या आर्थिक व चलनविषयक धोरणाचा घातुकपणा उघड करून दाखविला आहे. आपल्या मृत्यूच्या आदल्याच दिवशीं प्रा. काळे ह्यांनीं ह्या पत्रकाच्या मसुद्याची चर्चा करून त्यास मान्यता दिली.

### चलनविषयक वटहुकुमानें काय साधणार ?

चलन, खर्चाची तोंडमिळवणी, आर्थिक नियंत्रणें, इत्यादि बाबतींत सरकारनें युद्धकाळांत केलेल्या घोडचुकांचे दुष्परिणाम युद्धोत्तर काळींहि आपणांस भोगावे लागणार आहेत. भारी किंमतीच्या नोटांस बेकायदेशीर ठरविल्यानें केवळ चलनविस्तारास आळा बसू शकत नाहीं, कारण इकडे दर आठवड्यास चलनांत भर घालण्यांत येतच आहे. कांहीं समाज कंटकांस प्रत्यक्ष आर्थिक नुकसान किंवा करभार सोसण्यास लावण्यापलीकडे प्रस्तुत वटहुकुमाचा परिणाम होईल, असा संभव दिसत नाहीं. "तूट भरून काढण्यासाठी 'कायदेशीर' पैसा निर्माण करून मर्यादेबाहेर चलनविस्तार जोपर्यंत चालू ठेवण्यांत येत आहे, तोपर्यंत तो विस्तार व त्याचे काळाबाजार व नफेबाजी ह्यांसारखे दुष्परिणाम हीं आवाक्यांत आणतां येणें अशक्य आहे," हें आर्थिक व्यवहारांचें साधें तत्त्व सरकारास पटविण्यासाठी पुनः तें एकवार ठासून पुढें मांडणें अर्थशास्त्रज्ञांस अपरिहार्य वाटलें आहे.

### कोणाच्या फायद्यासाठी चलनविस्तार ?

हिंदुस्थान सरकार आतां इंग्लंडला चलन पुरवून आर्थिक सहाय करीत आहे, तें युद्ध जिंकण्यासाठी नसून त्या कर्जदार राष्ट्राची सुदृढ पायावर पुनर्घटना करण्यासाठीच आहे, हें उघड आहे. अशा तऱ्हेचा उदारपणा दाखविण्याजोगी हिंदुस्थानची परिस्थिति आहे काय? हा महत्त्वाचा प्रश्न अर्थशास्त्रज्ञांनीं उपस्थित केला आहे. युद्धकाळांतहि हिंदी लोकांचें रहाणीचें मान अगदी कनिष्ठ स्थितीस पोचलें होतें आणि चालू वर्षी तर भयानक दुष्काळ पडणार हें हिंदुस्थान सरकारनेंच जाहीर केलें आहे. अशा स्थितींत, बाहेरून तांदूळ, गहूं, ह्यासारखीं धान्यें आयात करणें अत्यावश्यक आहे. हिंदुस्थानाची आर्थिक व औद्योगिक गरज भागविण्यापूर्वीच इंग्लंडला कर्ज देत राहून त्या देशाची सोय पहाण्यांत हिंदुस्थान सरकार गुंतलें आहे. ब्रिटिश सरकारला आपला खर्च भागवितां येत नाहीं, म्हणून हिंदुस्थान सरकारनें त्यास कर्ज देण्यासाठीं फाजील चलन विस्ताराचा अवलंब करावयाचा, हा प्रकार अत्यंत दूषणास्पद आहे.

### कर्जांत वाढ तरी करूं नका

युद्धकाळांत हिंदुस्थानानें हालअपेष्टा सोसल्या व इंग्लंडला आपल्या ताकदीबाहेर सहाय केलें, त्यामुळें निर्माण झालेलें येणें इंग्लंडमध्यें साचून राहिलेलें आहे. त्या येण्यांत काट सुचविण्यांत येत आहे. ब्रिटिश साम्राज्यांतील स्वायत्त वसाहतींप्रमाणें, नागरिकांच्या किमान गरजांकडे लक्ष्य पुरवून आपलें आर्थिक धोरण हिंदुस्थान सरकारनें आखलें असतें, तर हिंदी लोकांवर हाल व अन्नाची वाण ह्यांचा प्रयोग होऊं शकला नसता. हिंदी औद्योगिक व आर्थिक योजनांच्या खर्चास इंग्लंडमधील आपलें येणें उपयोगी पडेल, ह्या अपेक्षेनें हिंदी युद्धोत्तर योजना आजवर आखण्यांत आल्या आहेत. ह्या येण्यांत एकीकडे काट सुचविण्यांत येत असतांनाच, तें वाढविण्याची कृति दुसऱ्या बाजूनें चालूच आहे. तेव्हां, इंग्लंडमधील येणें वाढूं न देणें ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे.

### सरकारवर दडपण आणण्याची आवश्यकता

अँग्लो-अमेरिकन करारावरील ब्रिटिश लोकमत काय आहे हें येथें पहाणें हिंदी लोकांस विशेष बोधप्रद होईल. "अमेरिकेनें इंग्लंडला दिलेलें कर्ज अपूर्व, इतिहासांत तोड नसलेलें व कल्पना आणि अवाढव्यपणां ह्यांत कमालीचें उदार आहे, असेंच त्रयस्थांस वाटतें; परंतु इंग्लंडमधील जनता अमेरिकेवर निष्ठुरपणाचा आरोप करीत आहे. अँग्लो-अमेरिकन करारांतील अटी कडक म्हटल्या, तर जगांतील अत्यंत श्रीमान राष्ट्रांपैकीं एका राष्ट्रास चलनविस्ताराचे द्वारा मोठाल्या रकमा कर्जाऊ देण्याची गरीब, दुष्काळग्रस्त हिंदुस्थानवर सक्ती करण्यांत येत आहे तिचें योग्य वर्णन करण्यास शब्दच अपुरे पडतील" असें अर्थशास्त्रज्ञांनीं आपलें मत सौम्य शब्दांत जाहीर केलें आहे. हिंदुस्थान सरकारच्या धोरणावर योग्य टीका करण्यास प्रमुख हिंदी अर्थशास्त्रज्ञ एकजुटीनें पुढें येऊं लागले आहेत, हें सुचिन्ह आहे. सरकारी आर्थिक धोरणासंबंधीं त्यांस वाटत असलेल्या तीव्र नापसंतीचें तें लक्षण आहे. सरकारच्या धोरणांत इष्ट तो बदल होण्यासाठी त्यावर दडपण आणण्याचे प्रयत्नांत, अर्थशास्त्रज्ञांच्या एकमुखी मतप्रदर्शनाचा निश्चित उपयोग होईल हें उघड आहे. १९४३ सालीं व आतांहि सरकारच्या घातुक धोरणाचें आविष्करण करण्यांत मुंबई प्रांतांतील स्वतंत्र विचाराच्या अर्थशास्त्रज्ञांनींच पुढाकार घेतलेला आहे. ही त्यांची कामगिरी अत्यंत मोलाची आहे.

## चेक लिहितांना घ्यावयाची दक्षता

अमेरिकेंतील बँकांकडे ३ कोटि चालू खातीं आहेत आणि पैशाचा व्यवहार खात्यावर चेक काढूनच मुख्यत: होतो. एक डॉलरचा व्यवहार रोखीनें झाला, तर १५० डॉलर्सचा व्यवहार चेकनें होतो, असें त्या व्यवहारांचें प्रमाण आहे. प्रत्येक चेकची सरासरी रकम ४१ डॉलर्स भरते आणि १८ हातांतून खेळल्या-नंतर तो मालकाकडे परत होतो. मोठ्या रकमांचे चेकहि कमी नसतात. डॉज ब्रदर्स लि. ची मालकी बदलली तेव्हां १४ कोटि, ६० लक्ष डॉलर्सचा चेक लिहिला गेला होता! चेक्सचे व्यवहार एवढ्या मोठ्या प्रमाणावर चालत असल्याकारणानें बनावट चेकचा धंदा इतर कोणत्याहि देशापेक्षां अमेरिकेंत भरभराटींत असणें स्वाभाविक आहे. तेथील गुप्त पोलीस खात्याकडे सालिना २०,००० खोट्या चेकचीं प्रकरणें तपासणीसाठीं येतात. चेकचा वापर, त्यांची चोरी व चेकबाबत लबाडचा ह्या बाबतींत सर्व देशांत अमेरिका अग्रेसर आहे. युद्धकाळांत ह्यासंबंधांतील गुन्हे तर फारच वाढले आहेत.

अशा तऱ्हेच्या लबाडीचा प्रयोग आपणांवर होऊं नये, ह्यासाठीं एका अमेरिकन पत्रानें वाचकांस खालील सूचना दिल्या आहेत.

(१) आपले चेक—कोरे, द्यावयाचे, आलेले, रद्द केलेले—सुरक्षित ठेवा.

(२) स्पष्ट सहीपेक्षा गिचमीड सहीप्रमाणें बनावट सही करणें सोपें असतें. स्पष्ट अक्षर व वेगानें लिहिणें ह्यांचा संयोग असेल, तर तें लिहिणें बनावट करणें अवघड जातें. म्हणून आपली सही स्पष्ट व जलद करण्यास शिका. जलद केलेल्या सहीची बनावट सही केली तर ती तात्काळ उघडकीस येते.

(४) शब्द किंवा आंकडे ह्यांचे आधीं किंवा मागें मोकळी जागा ठेवूं नका. सहाचे साठ (Six-Sixty), आठाचे ऐशी (Eight-Eighty), करणें फार सोपें असतें. तसेंच पांच (Five) डॉलर पंचावन (Fifty-five) सहज होऊं शकतात.

(५) चांगल्या रीतीनें लिहिलेल्या चेकचे वाटेस लबाड लोक जात नाहींत; ते कमी धोक्यांत वटवितां येईल अशा चेक्सची वाट पहातात.

### मुंबईसाठी दुधाची चार कोटींची योजना

युद्धोत्तर काळासाठी मुंबईकरितां हिंदुस्थान सरकारच्या ॲग्रिकल्चरल मार्केटिंग ॲडव्हाइसर या अधिकाऱ्यानें एक योजना तयार केली आहे. या योजनेप्रमाणें मुंबईसाठी एक मिल्क बोर्ड ऊर्फ दूध कमिटी नेमण्यांत येईल. या कमिटीकडे मुंबईतील दुधा-संबंधीं सर्व अधिकार रहातील. ही कमिटी दुधाची किंमत, दुधाचा पुरवठा, दुधाची मुंबईत आणण्याची व्यवस्था, दूध चोख मिळावें यासाठी करावी लागणारी सर्व तरतूद वगैरे करील. अन्न व शेतकी खात्याचा मंत्री या कमिटीचा अध्यक्ष असेल. दूध पुरवठा करणा-रांचा एक प्रतिनिधी, दूध वाटप करणारांचा एक प्रतिनिधी, मुंबईच्या नगरपालिकेचा एक प्रतिनिधी, दुधाचे रतीब घेणारांचा एक प्रतिनिधी, दूध मोटारीनें आणविणारांचा एक प्रतिनिधी व सरकारचे दोन प्रतिनिधी असे या कमिटीचे सभासद असतील. हल्ली मुंबईत रोज तीन लाख शेर दूध खपतें. त्याची वर्षाची किंमत आठ कोट रुपये होते. हल्ली मुंबईत ६४ हजार दुभतीं जनावरें असून त्यांची किंमत तीन कोट रुपये आहे. सध्या मुंबईची वस्ती २७ लाख आहे.

झारापकर
टेलरिंग कॉलेज
दादर, मुंबई १४.
माहिती मोफत मागवा

लहान मुलांकरितां
आर्को
गोड -एरंडेल- वापरा
: लक्ष्मी एजन्सी :
मंगळवार पेठ, कोल्हापूर

अत्यंत गुणकारी—
कामगार ब्राह्मी तेल
व
माधव गोकुल हेअर ऑईल वापरा.
म. गो. कुलकर्णी
किराणा-भुसार मालाचे व्यापारी,
फडतरे चौक, सदाशिव पेठ, पुणें २






# मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार २९।१।४६ | बुधवार ३०।१।४६ | गुरुवार ३१।२।४६ | शुक्रवार १।२।४६ | सोमवार ४।२।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; १९८० | १२९—८—९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २६६७—८ | २६४०—० | २६२६—४ | २६१०—० | २६३२—८ |
| ४८०; ३७२ | २३—०—० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४७७—८ | ४७२—८ | ४७१—८ | ४७०—० | ४७४—० |
| २२२२-८; १७६३-१२ | २५—०—०† | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २२४८—१२ | २२२७—८ | २२२०—० | २२३८—१२ | २२१५—० |
| ७०२; ५६६ | ९—०—०† | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ६७९—० | ६८१—० | ६७८—० | ६८१—० | ६८०—० |
| ६६८; ५०७ | २२—०—० | मे | स्वदेशी | १०० | ७२८—० | ७३२—० | ६९०—० | ७०९—० | ७१६—० |
| ४४३-८; ३६० | ९—०—०S | नोव्हें.-एप्रिल | नागपुर | १०० | ४६२—० | ४६१—० | ४७२—८ | ४५८—० | ४५५—० |
| ३३१-८; २७५ | १५—०—० | एप्रिल | फिनले | १०० | ३३४—० | ३३१—० | ३२९—० | ३२६—० | ३३२—० |
| | ५—०—०† | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३४७—८ | ३४३—० | ३४४—० | ३४३—० | ३४६—० |
| ३३७; २४३ | ४—०—०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३५३—८ | ३४७—० | ३४३—० | ३४०—८ | ३४१—८ |
| ५; ३-११-० | ०—४—० | मार्च | अपोलो | २ | ४-१५-६ | ४—१४—६ | ४-१४—० | ४ ११-६ | ४—१४—० |
| १७ १०; १३-७-० | ०—१५—८ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १७-१५ ० | १७—९ | १७—१० | १७—६ | १७—८ |
| ३-१०; २-९ | ०—३—० | मे | ,, डिफर्डस् | १ | ३—९—९ | ३—७—६ | ३—८—० | ३—७—६ | ३—७—६ |
| ७९०; ६४५ | ३५—०—० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ७६७—८ | ७५२—८ | ७४७—८ | ७४३—८ | ७३७—८ |
| २४३-८; २०६-८ | ७—०—० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २४७—४ | २४४—० | २४२—८ | २४३—० | २४३—० |
| २५६; २१३-८ | ८—०—० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २५७—० | २५८—० | २५९—० | २५५—० | २५६—० |
| ५९२-८; ५१०-० | ७—८—० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ६३७—८ | ६२८—१२ | ६२५—० | ६१७—८ | ६२२—८ |
| ४३-७; ३०-१२ | १—४—० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ४३— ५ | ४२—१० | ४२—६ | ४२—९ | ४२—६ |
| | | | ३½% रोखे | १०० | १०३—८ | १०३—८ | १०३—५ | १०३—२ | १०३—२ |

सोमवार दि. ४–२–४६ पासून बाजार दुपारीं १२ ते १॥ पर्यंत चालू आहे.

सोमवार दि. ४–२–४६ चे भाव

| ३% गव्हर्मेंट लोन्स | | बँका | | वीज कंपन्या | | संकीर्ण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९४६ | १०१–१२ | बरोडा | १६९—० | आंध्रा व्हॅली | १८५०—० | अलकॉक | ४६६—४ |
| १९५१–५४ | १०१–१४ | सेंट्रल | १०९—४ | बॉम्बे ट्रॅम | १५६–१२ | बॉंबे स्टीम | ५६२—८ |
| १९५७ | १०३—४ | इंडिया | २३०—० | टाटा हायड्रो | २१७—८ | न्यू इंडिया | ९५—८ |
| १९५९–६१ | १००–१५ | इंपी० | २४३७—८ | टाटा पॉवर | १९८५—० | शिवराजपुर | ५९—० |
| १९६३–६५ | ९९–१२ | | ६१२—८ | | | टाटा केमिकल | २४–१२ |
| १९६६–६८ | ९९—० | रिझर्व्ह | १५७—८ | | | टाटा ऑईल | ९०—० |
| १९७०–७५ | ९८—८ | युनियन | १२–१० | | | | |

### रंगूनमधील बँकांची हालहवाल

रंगूनमधील बँका १ जानेवारीपासून सुरू होतील असें जाहीर झालें होतें, परंतु अद्याप एकही बँक चालू झाली नाहीं. तिजोऱ्या बसविणें, फर्निचर लावणें वगैरे किरकोळ कामेंच अद्याप चालू आहेत आणि बँका उघडल्या तरी इतक्यांत धंदा विशेष चालेलसें वाटत नाहीं असें एका बँकरचें मत आहे. त्याच्या मताप्रमाणें बँका १ एप्रिलला चालू होतील. मात्र ग्रिंडले बँक पुढील आठवड्यांत उघडेल.

### भारी किंमतीच्या नोटा बदलून घेण्याची मुदत वाढ

रिझर्व्ह बँकेच्या शाखांचे मॅनेजर व अधिकारी ह्यांनीं भारी किंमतीच्या नोटा योग्य कारणास्तव व विशिष्ट बाबतींत ९ फेब्रुवारीपर्यंत स्वीकारून त्यांची मोड दिली तरी चालेल. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर व डेप्युटी गव्हर्नर ह्यांस २६ एप्रिलपर्यंत नोटा स्वीकारतां येतील. त्यानंतर मात्र अर्ज स्वीकारण्याची मर्यादा वाढविण्याची किंवा नाहीं हें प्रत्येक बाबतींत मध्यवर्ती सरकार ठरवील. २६ जानेवारी ही शेड्युल्ड बँका व सरकारी तिजोऱ्या ह्यांचेसाठीं अखेरची तारीख होती.

### देवकरण नानजी बँकिंग कं लि.

वरील बँकेस १९४५ सालीं मागील सालांतून ओढलेली बाकी नफा धरून ६,८३,५७४ रु. नफा झाला. प्रत्येक भागास करमाफ २ रु. डिव्हिडंड मिळेल.

### अमृत ऑईल मिल्स लि.

वनस्पति तुपाच्या उत्पादनासाठी वरील कंपनी डहाणूकर सन्स लि. नीं काढली आहे. तिचें अधिकृत भांडवल ५० लक्ष रु. असून त्यापैकीं ४० लाखांचें भांडवल विक्रीस काढण्यांत आलें आहे.

### अर्थशास्त्रज्ञांचें पत्रक

हिंदी अर्थशास्त्रज्ञांनीं सरकारी आर्थिक व चलनविषयक धोरणावर एक पत्रक ता. ४ रोजीं प्रसिद्ध केलें आहे, त्यावर प्रो. काळे, कर्वे, गाडगीळ, जठार, वाडिया, शहा, वेलिंगकर. जैन, बानर्जी, अंजारिया, नियोगी, लोकनाथन, अगरवाल इत्यादि २१ अर्थशास्त्रज्ञांच्या सह्या आहेत. तें पुणें येथूनच जाहीर करण्यांत आलें आहे.

### चीनसाठी हिंदुस्थानचा कापूस

हिंदुस्थान सरकार हिंदी कापूस व्यापाऱ्यांचें एक शिष्टमंडळ फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यांत शांघायला पाठविणार आहे. हें शिष्टमंडळ हिंदी कापूस चीनमध्यें किती खपवितां येईल याची पहाणी करणार आहे.

### इं. म. चेंबरचे अध्यक्ष व उपाध्यक्ष

इंडियन मर्चंट्स चेंबरच्या अध्यक्षाचे जागीं १९४६ सालाकरितां मि. महमद हुसेन हशम प्रेमजी ह्यांची निवड झाली आहे. मि. रतिलाल गांधी हे उपाध्यक्ष झाले आहेत.

## मध्यवर्ती असेंब्लींत आर्थिक प्रश्नांवर प्रकाश

### विश्वासघाताचें समर्थन

ब्रेटनवुडस कराराचें मूळ सभासदत्व हिंदुस्थान सरकारनें पत्करलें तें योग्य केलें असा एक ठराव फडणवीसांनीं मांडला. करारास मान्यता देण्यापूर्वी सरकार असेंब्लीचा सल्ला घेईल, असें माजी फडणवीसांनीं वचन दिलें होतें, परंतु तें प्रत्यक्ष पाळण्यांत आलें नसलें तरी त्याचा उद्देश लक्षांत घेऊन सरकारनें हितसंबंधींचा सल्ला घेतला असें त्यांनीं सांगितलें. हिंदुस्थानच्या इंग्लंडकडील वसुलीचा प्रश्न समाधानकारक सुटल्याविना आंतरराष्ट्रीय करारांचीं बंधनें स्वीकारणें हिंदुस्थानास हितावह होणार नाहीं असें मत श्री. मनु सुभेदार यांनीं व्यक्त केलें. रशिया व ऑस्ट्रेलिया हे जर बाहेर राहूं शकतात तर हिंदुस्थानानें सभासदत्व पत्करण्याची घाई कां ? असा प्रश्न प्रो. रंगा ह्यांनीं विचारला. अमेरिकेचें राजकीय व आर्थिक वर्चस्व आम्हांस नको, असें ते म्हणाले. हिंदुस्थाननें कांहीं काळ ताणून धरलें असतें, तर इंग्लंडकडून स्टर्लिंग येण्याच्या वसुलीबाबत सवलती मिळवितां आल्या असत्या असा श्री. नियोगी ह्यांचा अभिप्राय पडला. ह्या सर्व प्रश्नाचा विचार करून रिपोर्ट करण्यासाठी असेंब्लीच्या नऊ सभासदांची कमिटी नेमण्याचें अखेर ठरलें. असेंब्लीचा निर्णय मान्य करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. सरकारच्या विश्वासभंगाचा धिःकार करणारी उपसूचना मंजूर झाली.

### गंभीर धान्य परिस्थिति

देशाची वाढती गरज भागविण्यासाठी आवश्यक धान्य देशांत उपलब्ध होऊं शकत नाहीं, आयात रोडावली आहे आणि वादळें व अवर्षण ह्या आपत्तींची त्यांतच भर पडली आहे, ह्या कारणांमुळें हिंदुस्थानांतील अन्नपरिस्थिति गंभीर झाली असल्याचें अन्न खात्याचे सेक्रेटरी श्री. सेन ह्यांनीं सांगितलें. सर रॉबर्ट हचिंग्ज ह्यांची अमेरिकेंतील शिष्टाई अयशस्वी ठरली आहे आणि ते तिकडे गेले तेव्हांपेक्षां आतां परिस्थिति जास्त गंभीर झाली आहे. पंजाब, सिंध, संयुक्तप्रांत व बिहार ह्या प्रांतांतून जास्त धान्य जमवितां येण्याची शक्यता आहे. रेशनिंगचें क्षेत्र वाढवून जरूर तर दरमाणशीं रॅशन कमी करण्याची पाळी येणार आहे. धान्याची किंमत नियंत्रित करण्याचा सरकारचा निर्धार आहे. वरील माहिती श्री. सेन ह्यांनीं सांगितली. फूड ग्रेन्स पॉलिसी कमिटीनें २½ वर्षांपूर्वींच सांगितल्याप्रमाणें सरकारनें २७,५०,००० टन धान्य बाहेरून आणावयास हवें होतें; सरकारनें १७,००,००० टनांपेक्षां अधिक धान्य आणलें नाहीं अशी टीका मि. मसानी ह्यांनीं केली. मुंबई प्रांतास दरसाल १५½ लक्ष टन धान्य लागतें, त्यापैकीं ६½ लक्ष टनांचें उत्पादन प्रांतांतच होतें. मध्यवर्ती सरकारनें ६ लक्ष टन देण्याचें कबूल केलें आहे म्हणजे २½ लक्ष टनांची तूट पडणार आहे अगोदरच लोकांना प्रमाणशीर अन्न मिळत नाहीं तेव्हां रॅशनमध्यें काट केली जाणें समर्थनीय होणार नाहीं असा मसानी ह्यांनीं इशारा दिला. १८८० व १८९८ ह्या सालांतील दुष्काळांतहि सरकारनें दरमाणशीं दीड पौंड रेशन दिलें होतें. आतां मुंबईंतील मनुष्यास ½ पौंडच रेशन मिळणार असें दिसतें.

#### हिंदी रेलवेजचें उत्पन्न

| | कोटि रु. |
|---|---|
| १-४-४५ ते १०-१-४६ | १७०.४७ |
| १-४-४४ ते १०-१-४५ | १६१.८० |
| वाढावा | ८.६० |


ओलक ] फाफ मशिनच्या तोडीचीं [ ओलक

ओलक शिवण्याचीं यंत्रें

रोखीनें अगर हप्त्यानें मिळतात.

लिहा अगर भेटाः—व्ही. आर. बापट, ओलक मशिन कं., लकडी पुलाजवळ, लक्ष्मीरोड, पुणें नं. २

बिनचूकच्या माहितीनें

मोजक्या प्राप्तींत वाढत्या संसारखर्चास सहज आळा घालतां येतो

प्रत्यक्ष माहिती मोफत —— किंमत ४ आणे

—धी बॉम्बे जनरल एजन्सी—

भायखळा पुल, मुंबई नं. २७.

—— ः स्टॉकिस्ट पाहिजेत ः ——


पैसा आणि ज्ञान वाढवा !

श्रीमंत कसें व्हावें ?—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक ! हें भाग्यवर्धक पुस्तक हजारों रु. मिळवून देईल ! किं. १॥ रु., यशाचा सूर्योदय—व्यापार उद्योगधंद्यांत नक्की यश कसें मिळवावें तें शिकवितें. किं. १॥ रु., काम आणि कामिनी—नैसर्गिक काम सौख्याचें सुंदर विवेचन करतें. किं. १॥ रु., मृत्युलोकचा प्रवास—अद्‌भुत कथानक ! किं. १ रु.

—आजच लिहा—

मेसर्स—विपट आणि मंडळी, पो० कराड, जि. सातारा.

पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २७३८२

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

# स्फुट विचार

## युद्धकाळांत काढलेले वटहुकूम

महायुद्धाचा हिंदुस्थानांत अधिकृत शेवट १ एप्रिल रोजीं होणार आहे. घटना कायद्याच्या २०१ व्या कलमानुसार तांतडीची परिस्थिति जाहीर करण्यांत येऊन मध्यवर्ती सरकारास अनियंत्रित अधिकार देण्यांत आले आणि प्रांतिक क्षेत्रांतहि कायदे करणें व त्यांची अंमलबजावणी करणें हें त्यास शक्य झालें. ह्या कलमाच्या आधारानें मध्यवर्ती सरकारनें केलेले सर्व कायदे युद्धसमाप्तीनंतर सहा महिन्यांनीं म्हणजे सप्टेंबरअखेर आपोआप रद्द होणार आहेत, तथापि अन्न पुरवठ्यासारख्या मूलग्राही प्रश्नाचे बाबतींत मध्यवर्ती व प्रांतिक नियंत्रणांत सहकार्याचें धोरण दीर्घकाल आवश्यक ठरणार आहे. भारत संरक्षण कायदा व त्याखालील नियम हे रद्द झाले तरी आयात व निर्गत ह्यांवरील नियंत्रणें कायम रहातील, कारण ती मध्यवर्ती सरकारच्या नेहमीच्याच कक्षेंतील बाब आहे. घटना कायद्याच्या ७२ व्या कलमानें वटहुकुमांची कमाल मुदत सहा महिन्यांची सांगितलेली आहे; परंतु युद्धकाळांत पार्लमेंटानें ही कालमर्यादा रद्द केली. त्याकारणानें, युद्धाच्या तांतडीच्या परिस्थितींत काढलेले वटहुकूम बिनमुदत चालू रहाणार आहेत. ते रद्द करण्यासाठी नवा वटहुकूम काढला पाहिजे किंवा नवा कायदा तरी केला पाहिजे. ७ जानेवारी रोजीं एका वटहुकुमानें ११३ वटहुकूम रद्द केलेच आहेत.

## प्रत्यक्ष कृतीवरूनच परीक्षा होणार

हिंदुस्थान सरकारचे अन्नमंत्रि सर ज्वालाप्रसाद व कृषिमंत्रि सर जोगेंद्रसिंह ह्यांनीं गेल्या आठवड्यांत वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींपुढें हिंदुस्थान सरकारच्या अन्न व शेतीविषयक धोरणाची घोषणा केली. घोषणेंत नवें असें काय आहे, अशा एका प्रश्नास "कल्पना आतां एका विशिष्ट योजनेंत गोवण्यांत आल्या आहेत" असें उत्तर मिळालें. सरकारचें धोरण अंमलांत आणण्यासाठी खर्चाची तरतूद करावी लागेल व त्याकरितां येत्या अंदाजपत्रकांत मागणी करण्यांत येईल. मध्यवर्ती असेंब्लीपुढें तो प्रश्न त्यावेळीं चर्चेस निघेलच व सरकारच्या धोरणाची कसून छाननी होईल. जनतेचें हितसंवर्धन करणें, त्यांच्या रहाणीचें मान क्रमशः वाढविणें, सर्वांस पुरेसें व योग्य दर्जाचें अन्न पुरविणें, हीं उद्दिष्टें हिंदुस्थान सरकारनें आपल्यापुढें ठेवलीं आहेत. अन्नाचें उत्पादन वाढविणें, दर एकरीं उत्पादन सुधारणें, निसर्गावरील अवलंबन कमी करणें, दुष्काळाची भीति नष्ट करणें, शेतकऱ्यांची भरभराट घडवून आणविणें, वगैरे गोष्टींसाठी मध्यवर्ती व प्रांतिक सरकारें शिकस्त करणार असल्याचें सांगण्यांत येत आहे. हिंदी संस्थानांचें सहकार्यहि मिळविण्यांत यावयाचें आहे. उत्पादकास व गिऱ्हाइकास दोघांसहि योग्य वाटेल अशा किंमतीस मालाची देवघेव व्हावी, अशी कायमची योजना आखण्याचा सरकारचा विचार आहे. शेतीच्या वाढीसाठी मध्यवर्ती सरकार प्रांतिक सरकारांस ग्रँट देणार आहे. शिक्षण, संशोधन, तज्ज्ञांचा सल्ला उपलब्ध करून देणें, इत्यादि बाबींतहि हिंदुस्थान सरकार पुढाकार घेणार आहे. प्राथमिक कामाची जबाबदारी प्रांतिक सरकारांवर आहे. मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांच्यामध्यें दुवा निर्माण करून योजनांत सातत्य रहावें ह्यासाठी एक खास संस्था निर्माण करण्यांत यावयाची आहे. हिंदुस्थान सरकारनें जाहीर केलेलीं उद्दिष्टें योग्य आहेत ह्यांत वाद नाहीं; परंतु सध्याचीं मध्यवर्ती व प्रांतिक सरकारें आणि त्यांचे अधिकारी किती झटून प्रत्यक्ष काम करणार आहेत, लोकांत विश्वास व उत्साह किती निर्माण होणार आहे, योजनांची प्रगति किती झपाट्यानें होणार आहे, त्यांची अंमलबजावणी किती काटकसरीनें होणार आहे, इत्यादि प्रश्न येथें अधिक महत्त्वाचे आहेत.

## जमिनीचा नाश थांबविण्यासाठी यांत्रिक सहाय

मुंबई प्रांताचे डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर, सर विल्यम जेंकिन्स हे अमेरिकेची सफर करून नुकतेच परत आले. धुपून जाणाऱ्या जमिनीचा नाश थांबविण्याचे त्या देशांतील प्रयत्न त्यांनीं अवलोकन केले. टेक्सस व न्यू मेक्सिको स्टेट्समधील हवा व इतर परिस्थिति महाराष्ट्रांतील दुष्काळी विभागांतील परिस्थितीसारखीच आहे. तेव्हां जमिनीचा नाश थांबविण्याच्या अमेरिकेंत चालू असलेल्या पद्धतीनें हा दुष्काळी विभागांत तात्काळ प्रयोग सुरू करण्याचा सरकारचा विचार असल्याचें त्यांनीं जाहीर केलें आहे. ट्रॅक्टर्स, ग्रेडर्स, वगैरे यंत्रसामुग्री वापरल्यानें हातानें काम करण्यामुळें येणाऱ्या खर्चाचे ५०% बचत होईल व कामहि मोठ्या प्रमाणावर हातीं घेतां येईल, असें त्यांनीं सांगितलें. अमेरिकेंत यशस्वी झालेली पद्धति आपल्या इकडेहि यशस्वी होईल असा त्यांचा विश्वास आहे.

## आयर्लंड व हिंदुस्थान

आयर्लंड हा देश युद्धांत तटस्थ राहिल्यानें त्याचें कांहींहि नुकसान न होतां, उलट त्याचें ग्रेटब्रिटनमधील येणें फुगून राहिलें आहे. ग्रेट ब्रिटननें आयर्लंडकडून अन्न वगैरे विकत घेतलें त्याची द्यावयाची किंमत ४५ कोटि पौंड झाली आहे. ह्या रकमेंतून आयर्लंडला पाहिजे तो माल ग्रेट ब्रिटनकडून पुढें घेतां येईल. आपल्या आकाराच्या मानानें तुलनात्मक दृष्टीनें पहातां आयर्लंड हें सर्वांत मोठें धनको राष्ट्र बनलें आहे. युद्धांत प्रत्यक्ष उडी न घेतांहि आयर्लंडच्या कामगारांना ग्रेटब्रिटनमध्यें काम मिळालें. हे कामगार आयर्लंडमध्यें १½ कोटि पौंड आपल्या मिळकतींतून दरसाल पाठवीत असत. युद्धांत सामील न झालेल्या व युद्धासाठीं अपूर्व स्वार्थत्याग केलेल्या अशा अनुक्रमें आयर्लंड व हिंदुस्थान ह्या दोन्हीं देशांचीं येणीं ग्रेटब्रिटनमध्यें साचून राहिलीं आहेत. हिंदुस्थानानें आपल्या येण्याचा कांहीं भाग सोडून द्यावा अशीं बोलणीं ऐकूं येत आहेत. आयर्लंड आपलें किती येणें सोडून देण्यास तयार होतो व हिंदुस्थानास तें किती सोडावें लागतें, ह्याची तुलना बोधप्रद होईल.

## धान्य का कपास?

"१९४५–४६ च्या कपाशीच्या मोसमाचे अखेर २१ लक्ष गांठी कपाशीचा साठा राहील, त्यापैकीं निम्मा साठा आखूड धाग्याच्या कपाशीचा असेल. तेव्हां कांहीं काळ तरी कपाशीचा तुटवडा हिंदुस्थानांत भासण्याचें प्रयोजन नाहीं. ह्या उलट, धान्याचा पुरवठा अपुरा पडण्याची फार मोठी भीति आहे. ही परिस्थिति एक–दोन वर्षांत सुधारेल असें दिसत नाहीं. आणखी ५० लक्ष एकर कपाशीस देण्यास सांगणारे अन्नपरिस्थितीवर कांहीं इलाज सांगतील काय? पुरेसें धान्य आयात होण्याची खात्री झाल्याविना, धान्याखालील जमिनींत कपास पेरूं देणें घातुक ठरेल. धान्याच्या आयातीची शक्यता फारशी दिसत नाहीं."

—श्री. आर. जी. सरय्या, चेअरमन, मुं. प्रां. सहकारी बँक लि.

# NOTICE.

One brand new Chevrolet motor goods truck damaged in accident will be sold by public auction on 20-2-46 in the office of the Sub-Divisional Officer Poona North Sub-Divn. Central Offices Poona. Engine and other parts have been dismantled and can be viewed at the Bombay Garage Poona's work shop at any time from 10 A. M. to 12 A. M. and 2 P. M. to 4 P. M. on working days excepting Saturdays. Conditions of sale can be seen in the office of the Sub-Divisional Officer, Poona North Sub-Dn. Central Offices during office hours.

S. K. Karandikar,
Executive Engineer,
Poona Division.

Poona.

---

मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड

## विशेष साधारण सभा.

जाहीर करण्यांत येतें कीं, दि बाँबे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक, लि. ची विशेष साधारण सभा शनिवार ता. ९ फेब्रुवारी सन १९४६ रोजीं दुपारीं २-३० वाजतां ( स्टँ. टा. ) बँकेच्या रजिस्टर्ड ऑफिसमध्यें ९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई, येथें बँकेच्या पोट-नियमांत खालील दुरुस्तीबद्दल विचार करण्याकरितां व योग्य वाटल्यास त्या मंजूर करण्यासाठी भरणार आहेः—

( १ ) पोट-नियम नं. २ ( एफ )

खालील पोट-कलम ( ६ ) जादा घालण्यांत यावें :
" 'अ' व 'ब' वर्गातील सभासदांना बाँबे ॲग्रिकल्चरल डेटर्स रिलीफ ॲक्टच्या २ ( ७ ) कलमांत ठरविल्याप्रमाणें पिकांसाठी कर्ज देण्याकरितां "

( २ ) पोट-नियम नं. १२ अ.

ओळ ६ ह्यामधील 'बँक.' व 'ज्या अर्थी" ( " provided " ) ह्यामध्यें खालील शब्द जादा घालण्यांत यावेतः
" आणि किंवा धी बाँबे ॲग्रिकल्चरल डेटर्स रिलीफ ॲक्ट, १९३९ च्या कायद्याप्रमाणें ज्यांच्या अर्जाची चौकशी चालूं असेल अगर हुकुमनामा झाला असेल अशांना "

( ३ ) पोट नियम नं. ७२ ( आय )

खालील पोट—कलम ( ४ ) जादा घालण्यांत यावे:
" 'अ' व 'ब' वर्गातील सभासदांना बाँबे ॲग्रिकल्चरल डेटर्स रिलीफ ॲक्टच्या कलम २ ( ७ ) प्रमाणें लागणारीं कर्जें देणें.

बोर्डाच्या हुकुमावरून,
वैकुंठ ल. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

मुंबई, ता. १९ जानेवारी १९४६.

---


## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार


## जाहीर नोटीस

कळविण्यांत येतें कीं, पूना बिल्डिंग सबडिव्हिजनमधील जुन्या रिकाम्या डांबरांचें टिपांचा जाहीर लिलांव खाली लिहिल्याप्रमाणें करण्यांत येईल.

१ येरवडा P. W. D. स्टोअरवर शुक्रवार ता. ८।२।१९४६ रोजीं सकाळीं १० वाजतां. ( ड्रम ६८० चा ).

२ ससून स्टोअरवर त्याच दिवशीं म्हणजे ता. ८।२।१९४६ रोजीं दुपारीं ४ वाजतां. ( ड्रम १५० चा ).

तरी ज्यांची खुशी लिलांव घेणेची असेल त्यांनीं सदर दिवशीं नेमलेल्या वेळीं नेमलेल्या ठिकाणीं हजर राहून लिलांवांत बोलावें.

लिलांवाच्या शर्ती लिलांवाचे वेळीं जागेवर वांचून दाखविल्या जातील व त्यासंबंधीं इतर माहिती खाली सही करणार यांचे ऑफिसांत रविवार अगर सुट्टीचे दिवस खेरीज करून इतर दिवशीं मिळेल. कळावें.

एन्. एम्. वढवाना,
असिस्टंट इंजिनिअर
पूना बिल्डिंग्ज सबडिव्हिजन.

पूना सेंट्रल ऑफिसेस, तिसरा मजला, रूम नं. ३६
पूना बिल्डिंग्ज सबडिव्हिजन.

---

# NOTICE

**The Bank of Maharashtra, Limited.**

Notice is hereby given that the eleventh Ordinary General Meeting of the Shareholders of the Bank of Maharashtra Ltd., will be held at the Registered Office of the Bank, Kakakuwa Mansion, Laxmi Road, Poona City, on Sunday, the 24th day of February 1946, at 4 p. m. ( S. T. ) to transact the following business.

(1) To receive and consider the Balance Sheet, the Profit and Loss Account, and the Reports of the Directors and of the Auditors for the year ended 31st December, 1945.

*(2) To declare Dividend.

(3) To elect three Directors in the places of the retiring Directors who are eligible for reelection.

(4) To appoint Auditors and to fix their remuneration.

(5) To transact such other business as may be allowed by the Chairman.

By order of the Board
C. V. Joag,
Manager.

Poona City,
27th January, 1946.

*N. B.*—The Transfer Books of the Bank will be closed from the 14th day of February to the 28th day of February, 1946, both days inclusive.

*The Dividend, when sanctioned, will be payable on and after Friday, the 22nd March 1946 and the Dividend Warrants will be posted to the registered Addresses of the Share holders. Change of address, if any, should immedintely be communicated to the Bank.

## कर्नाटकाची मलप्रभा

लेकक:—श्री. के. जे. तव्रनाप्पा, बेळगांव.

मलप्रभा ही घटप्रभेची मोठी बहीण कर्नाटकांतच बेळगांव जिल्ह्याच्या पश्चिमेकडील शेवटच्या खानापूर तालुक्यांत उगम पावून कर्नाटकांतच कृष्णार्पण होते. ना शेतीधार्जिणी कीं कारखानेधार्जिणी. नव्ही फुंकिली सोनारें, इकडुनी तिकडे गेलें वारें याप्रमाणेंच पावसाचें पाणी जमा करणेचें व अत्यंत तीव्र वेगानें पुढें वाहून नेण्याचें कार्य ती करते नाहीं म्हणावयास. प्राचीन जैन राजांनीं, कदंबांनीं, विजयानगरच्या हिंदु बादशहांनीं, अलीकडे विजापूरच्या मोगल बहामनी मुसलमानी राजांनीं, शिवछत्रपतींच्या मराठे वीरांनीं व पेशव्यांनीं ज्या कर्नाटक भूमीस पुनीत केलें असून त्यांचीं सारीं वैभवें आज कर्नाटकांत जिवंत आहेत त्यांमध्येंच अहिंसेचे परमभक्त महात्मा गांधी यांची "आधुनिक गीता" होऊं शकेल अशीं वचनें प्रतिपादणारा वेदांतील चातुर्वर्ण्यें पायाखालीं तुडवून महार-चांभारांपासून सर्व मानवांस कवटाळणारा लिंगायत धर्म संस्थापक बसवेश्वराचे कृष्णा—मलप्रभेचे कडील संगम त्याच्या प्राणाहुतीची पुण्य भूमि होऊन राहिली आहे. हीच काय ती मलप्रभेची ऐतिहासिक थोरवी.

अलीकडे वर्षापूर्वीं वर्तमानपत्रांतून रामदुर्ग संस्थान एक लाख रुपये खर्च करून मलप्रभेस धरण बांधून पाटबंवारे काढणार आहे असें वृत्त आलें होतें. त्याची पुढील हकीकत लेखकास माहीत नाहीं. खानपूरचा रेल्वे पूल पाण्याच्या पुरापासून संरक्षण करण्याकरितां सरकारानें खास संशोधन केल्यानंतर त्यांनीं पुलाखालीं एक मैल लांबपर्यंत नदीचा उजवा तीर कापून रुंद केला तेव्हांपासून पूल वाहून जाण्याचा धोका कायमचा टाळला गेला आहे. सर्व विध्वंसक लढाई पण तिच्याच पुण्याईनें याच रेल्वे पुलाखालीं सातारच्या श्री. सोमणांचा (एम. एल. सी. सोमण नव्हे) कार्ड बोर्डचा यांत्रिक वायसरचा लहानसा कारखाना, येथून फर्लांगाच्या आंत पायोनियर टाईल अँड फायर ब्रिकचा कारखाना आणखी थोडें वर चढल्यास श्री. सबनीस यांच्या प्रयत्नानें मुंबईच्या लक्ष्मीपुत्रानें पुढें मागें साखरेचा कारखाना उघडण्याकरितां सुरू केलेला मंचापूरचा 'सुगरकेन फार्म' आणि आणखी थोडें वर चढलेस असोग्याचे इनामदार शेतकीचे पदवीधर श्री. दीक्षित यांनीं सर्वसामान्य हिंदी इसमांच्या मनोवृत्तीप्रमाणें सरकारी, अगर एखाद्या साखर कारखान्याच्या फार्मवर नोकरी करण्याच्या मोहांत न पडतां नदीकांठींच आपल्या स्वतःच्या जमिनींत प्रतिकूल आर्थिक परिस्थिति असतांना आपल्या स्वतःच्या कर्तबगारीवर असोगा येथें नमुनेदार फार्म तयार केलें असून, तें सर्व शेतकी पदवीधरांना आदर्श बनून राहिलें आहे. आतां रेल्वे पुलाच्या खाली उतरून लगेच पुलास लागून नदीतीरीं सरकारी देशी दारूची डिस्टिलरी कारखान्याची मजबूत टोलेजंग दगडी इमारत पंचमहाभूतांना तोंड देत आज कित्येक वर्षे, कारखाना नाशिकला हलविला गेल्यानें आपली बिचारी एकाकी जीवन कंठीत आहे. कोण योजक तिच्या सहायास येईल, त्याला ती निद्रान प्रांतांत राष्ट्रीय मंत्रिमंडळें आरूढ झाल्यावर माळ घालील. थोडें खालीं, श्री. काळे यांच्या चालकत्वाखालील चायनाक्ले शुद्ध करण्याची भट्टी आहे. आणखी खालीं सरकल्यास दामले बंधूंची कार्ड—बोर्ड फॅक्टरी आहे. आणखी खालीं खासगी भागीदारीची ऑटोमॅटिक राइस मिलींग प्लँट आहे. युद्ध सुरू होण्याच्या सुमारास कॉंग्रेस मंत्रिमंडळाच्या प्रोत्साहनानें तेथें पेपर मिल काढण्याची योजना आंखून दि कॅनरा पेपर ॲण्ड पल्प मिल्स कं. लि. निघाली. परंतु परिस्थितीमुळें कंपनीनें पुणें व मुंबईच्या मुंढवा पेपर मिलची म्यानेजिंग एजन्सी घेतली. खानापूरचे आसपास वन्य-संपत्ति व विविध प्रकारची खनिज संपत्ति यानें समृद्ध असलेली भूमि असून, कष्टाळू स्वस्त मजुरांचा पुरवठा, रेल्वे व रस्त्यांच्या दळणवळणाचीं उत्तम साधनें, शिवाय जवळच उत्तर कानडा जिल्ह्यांत कॅसलरॉक स्टेशनहून ५--७ मैलांवर पांढऱ्या नदीच्या धबण्याच्या धबधब्यापासून हैड्रो--इलेक्ट्रिकचा पुरवठा करून घेण्याची शक्यता असून, हाडांपासून खतें तयार करण्याचा फर्टिलाईझर कारखाना, पेपर व पल्प कारखाना, सेल्युलोज कारखाना, हिरड्यापासून टॅनीन एक्सट्रॅक्ट काढण्याचा कारखाना, काच कारखाना, मॅंगनीज व बॉक्साईट स्मेल्टींग कारखाने, आयुर्वेदिक औषधी कारखाना, चायनाक्ले पोर्सलेन वेअर कारखाना, अमेरिकेंत नवीन शोध निघून तेथें जे व्हिटयामिनाइज्ड राईस मिल्स निघाले आहेत त्या प्रकारचा राईस कन्व्हर्टिंग मिल कारखाना, मंगलोरी कौलांचा कारखाना, रेशीम कारखाना, प्लॅस्टिक कारखाना, रेयॉन कृत्रिम रेशीम कारखाना, रागी माल्ट, रताळी स्टार्च, वाळूपासून औद्योगिक स्टार्च, साखर कारखाना, असे अनेक धंदे काढून एकत्रित केंद्रीभूत करितां येतील, असें हें कर्नाटकाचें हैद्राबादी निजामबाद होऊं शकणारें केंद्र आहे, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. कोणी ब्रिटिश किलिक निक्सन, शा वॉलेस अगर हिंदी लक्ष्मीपुत्र टाटा, बिर्लाज, यांच्यासारख्यांनीं ह्या ठाण्यास हात घालणेचे पूर्वीच सर एम. विश्वेश्वरय्या ह्यांनीं अव्याहत प्रतिपादन करीत आल्याप्रमाणें स्थानिक त्या त्या झोनच्या लोकांनीं पुढें होऊन स्थानिक भांडवल, स्थानिक व्यवस्थेखालील धंदे उभारून समाजास नवीन संपत्ति निर्माण करून मजुरांस नवीन रोजगारी देऊन राष्ट्राचे उन्नतीस हातभार लावून राष्ट्र स्वयंपोषक बनण्यास लागणाऱ्या भागाचा हिस्सा उचलणेस तयार झालें पाहिजे. युद्ध थांबलें.इंग्लंड, अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, स्वीडन तुमचा बाजार कांहीं वर्षे नव्हे, महिने नव्हे, १०-२० आठवड्याच्या आंत कबजा करणेस अस्तन्या सारीत आहेत. आतां तुम्हास शिस्तीनें विचार करणेस सवड नाहीं. तातडतोब कामास लागलें पाहिजे. आम्हांस ब्रिटिश सायकली, फाऊंटन पेन नकोत; ते तयार करण्याची माशिनरी पाहिजे म्हणून सांगतां आलें पाहिजे.

असोगा येथें मुंबई सरकार मलप्रभेस लहानसें धरण बांधणार असून निरा राईट बॅंक व लेफ्ट बॅंक कॅनॉलप्रमाणें छोटेसे दोन कालवे काढणार आहे व नवीनच स्थापन झालेली इलाख्यांतील आद्य दि बॉंबे सिल्क फिलेचर्स लि. कंपनी पुणें--बेंगलोर रॉयल रोडला मलप्रभेच्या कांठींच दास्तीकोम येथें सिल्क फिलेचरचा कारखाना उघडणार आहे. यावरून मलप्रभेचा भावी इतिहास घडविला जात आहे हें पाहून लेखकास संतोषाचे सुस्कारे सोडण्यास थोडी बहुत आशा वाटते.

---

### हिंदुस्थान सरकारचे हिशोब

आक्टोबर १९४५ अखेर केलेल्या मध्यवर्ती सरकारच्या हिशोबावरून असें दिसून येतें कीं, १९४५-४६ च्या पहिल्या सात महिन्यांच्या अखेरीस हिंदी सरकारनें उत्पन्नापेक्षां १२५ कोट रुपये अधिक खर्च केले. गतवर्षीं याच काळांतील खर्च १२२ कोटींनीं अधिक होता. याच काळांत उत्पन्न ३१ कोटींनीं वाढलें आहे. पण लष्करावरील खर्च २६ कोटींनीं वाढून आतांपर्यंत२२३ कोटींनीं अधिक झाला आहे व मुलकी खर्चाचीही ८ कोटींनीं वाढ झाली आहे. या सात महिन्यांत हिंदुस्थानच्या कर्जांत १७५ कोटींची वाढ झाली आहे.

—: साठे बिस्किटें :—

श्रूसबरी, ऑरेंज, फ्रॅन्सिस व फॅमिली मुंबई प्रांतांतील ग्राहकांस पूर्ववत् मिळूं लागलीं. परिस्थिति अनुकूल होतांच इतर प्रांतांतील ग्राहकांसही पाठवूं शकूं.

——साठे बिस्किट कं., पुणें २

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

श्री

# दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

कंपनीनें चार लक्ष रुपयांचे ऑर्डिनरी शेअर दर शेअरला रु. ५ प्रिमिअम असे विक्रीस काढले आहेत.

## युद्धोत्तर कालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण

वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.


हें पत्र पुणें, पेठ मोबुदां घ. नं. ११५१/१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे. बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' मोबुदां, घ. नं. १२४/११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.